# प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/९८६३/२०२५ पुणे दिनांक - २०/०२/२०२५

दि. २२/०२/२०२५ रोजी पुणे शहरात केंद्रिय गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी पश्चिम विभागीय बैठक आयोजीत केली आहे. सदर बैठकीसाठी महाराष्ट्र, गुजरात, गोवा, दादर आणि नगर हवेली, दमण आणि दीव या राज्याचे व्ही.व्ही.आय.पी. हजर राहणार आहे. सदर बैठकीच्या अनुषंगाने मा. व्ही.व्ही.आय.पी. यांचे दौरे शहरात मोठ्या प्रमाणात आहेत. शहरातील वाहतुक व्यवस्था व नियमासाठी तसेच सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, पुणे शहर वाहतुक विभागातील सर्व रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**दि. २२/०२/२०२५ रोजी ००.०१ ते २४.०० वा. पर्यंत सर्व प्रकारची जड / अवजड वाहने तसेच मिक्सर (RMC), डंपर, हायवा व स्लो मुव्हिंग (जे.सी.बी.,रोड रोलर, टॅक्टर इ.) वाहनांना पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व रस्त्यांवर वाहतुकीस बंदी करण्यात येत आहे.**

**( सदर्भ :- १) जाक्र/पोउआ/वाहतुक/नियो/९७४/२०२५ दि. ०५/०२/२०२५**
**२) जाक्र/पोउआ/वाहतुक/नियो/९७५/२०२५ दि. ०५/०२/२०२५ अन्वये)**

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

**प्रति,**

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :-**

२) **पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) **प्रभारी अधिकारी सर्व वाहतुक विभाग, पुणे शहर.**

४) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

५) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**